Vol 5 Issue 1 July 2015 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

# उचल्या (1988) – लक्ष्मण गायकवाड

प्रा. गणपत हराळे

सारांश :

लक्ष्मण गायकवाड हे मराठीतील एक सुप्रसिध्द आत्मचरित्रकार, विचारवंत आणि लेखक म्हणून प्रसिध्द आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत त्यांनी समाजसेवेचे व्रत स्वीकारले आहे. त्यांचे 'उचल्या' हे आत्मचरित्र मराठी आत्मचरित्राच्या क्षेत्रातील मैलाचा दगड मानले जाते. 1976 मध्ये त्यांची आणीबाणीवरची दीर्घकविता खूपच गाजली. त्यांची समाजिक परिवर्तनाची आस आणि प्रत्यक्ष स्वानुभवातून आलेली समाजसेवेची तळमळ यामुळे त्यांच्या सहित्याला वेगळे मूल्य प्राप्त झालेले आहे. लक्ष्मण गायकवाडांची 'उचल्या' (1887), 'दुभंग'(1998) 'चिनी मांतीतील दिवस'(1998), 'वडार वेदना' (2000) ही अतिशय गाजलेली पुस्तके आहेत.

**Short Profile**

Prof. Ganapat Harale is working in Ganapatrao Arwade commerce college, Sangli.

**प्रास्ताविक:**

उचल्या हे लक्ष्मण गायकवाड यांचे बहुचर्चित आणि साहित्यक्षेत्रात अमाप यश लाभलेले आत्मचरित्र 1987 साली प्रसिध्द झालेले आहे. 'उचल्या' ही आत्मकथा लक्ष्मण गायकवाड ह्या घडपडणाऱ्या युवक कार्यकर्त्याची कहाणी आहे. वडार समाजातील एक चिंतनशील कार्यकर्त्याचे हे आत्मकथन आहे. ना जन्मदिवस, ना गाव, ना घर, ना शेत, ना एक जात अशा एक उचल्या जातीत(उपरा पृष्ठ क्र.1) लेखकाचा जन्म आणि जन्मल्यापासून अखेरपर्यंत गुन्हेगारीचा शिक्का कपाळावर बसवलेल्या उचल्या या जातीत लक्ष्मण गायकवाड यांचा जन्म झाला. उचल्या ही काही जात नाही. पोटासाठी चोरी करणाऱ्या अनेक जातींचे लोक या समुहात समाविष्ठ होत गेले. आणि उचल्यांची एक जातच निर्माण झाली. या जाती जन्मल्यामुळे अनेक प्रश्न लहाणपणासून लेखकाला बेचैन करित असतात. रोजगार मिळत नाही म्हणून पोटासाठी चोरी करणारा माणूस गुन्हेगार ठरतो. आणि भ्रष्टाचार करुन कोटयावधी रुपये बळकावणारा प्रतिष्ठेने जगतो ही विसंगती लेखकाला विचार करायला लावते.

उचल्या किंवा पाथरुट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमातीचा परिचय करुन देणारे हे आत्मकथन आहे. टकारी, भामटा, उचले, गीरने वडार, कामाटी घंटीचोर, वडार अशा वेगवेगळ्या नावांनी त्यांची जात ओळखली जाते. उचल्या हे लक्ष्मण गायकवाडांचे गुन्हेगार जमातीतल्या लेखकांचे हे पहिलेच आत्मकथन असल्याने त्याची विपुल चर्चा झालेली आहे. भटक्या विमुक्त जमातींच्या व्यथा वेदनांना आणि प्रश्नांना लोकांपुढे आणणारी कलाकृती म्हणून ह्या पुस्तकाचे मूल्य खूप मोठे आहे. उचल्या मध्ये उचल्या(वडार) समाजाच्या उपेक्षेचे जीवन आणि त्यांची पदोपदी होणारी अवहेलना यांचे दर्शन घडविले आहे. 'उचल्या' हे समाज व्यवस्थेने चोर ठरविलेल्या एका समाजाचे चित्रण आहे.

गुन्हेगार मानल्या गेलेल्या समाजाचे शोषण, प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष गुन्हेगारीला दिले जाणारे प्रोत्साहन, चोरीच्या संशयावरुन पोलिसांकडून होणारे अत्याचार, त्यांचे भ्रष्टाचार या गोष्टींवर या आत्मकथनातून झगझगीत प्रकाश पडतो. उचल्यांचे जीवन त्यांच्या चालीरीती, नीतिविषयक कल्पना, त्यांच्या चोरी करणाच्या युक्त्या त्यांच्या जात पंचायती, त्यांची सांकेतिक भाषा यांचे वास्तववादी चित्रण या आत्मकथनांमुळेच मराठीत आलेले आहे. अत्यंत सहज असे निवेदन व अस्सल अनुभवाचे स्वाभाविक चित्रण असे या आत्मकथनाचे स्वरूप आहे. पुढे भटक्यांचे प्रश्न सोडवणारा कार्यकर्ता म्हणून लक्ष्मण गायकवाडांच्या जीवनाला एक दिशा कशी मिळाली तेही या आत्मकथनातूनच पहावयास मिळते.

'उचल्या' मध्ये लक्ष्मण गायकवाडांच्या विकसित अवस्थेबरोबरच उचल्या या जमातींचे सर्वांगीण चित्रण आलेली आहे. उचल्यांची दैन्यावस्था, अज्ञान, श्रध्दा, अंधश्रध्दा, नवस–सायास, लग्नविधी, अत्यंविधी इत्यादींची माहिती या आत्मकथनातून पहावयास मिळते. दारिद्रयाने माणसे गांजल्यामुळे जवळची माणसेसुध्दा कशी निष्ठूरपणाने वागतात याचे प्रांजळ रेखाटन लेखकाने केले आहे. लक्ष्मण गायकवाडांच्या घरात सुरुवातीच्या काळात अठराविश्व दारिद्रय असल्यामुळे अत्यंत हलाखीचे जीवन त्याला जगावे लागते. त्यांनी आपल्या हलाखीच्या जीवनाचे वर्णन करताना म्हटले आहे की, ''आमी लई दिवस गाढव काटयाचा पाला, तरवठयाला पाला, गाजराचा पाला, कुर्डूचा पाला, दगडी शेपू अशा प्रकारचा पाला खाऊन दिवस काढत होतो. (उचल्या पृष्ठ क्र. 32) यावरुन लक्ष्मण गायकवाडांना किती पशुतुल्य प्रकारचे जीवन जगावे लागत हाते याचा दाखला मिळतो. आम्हाला कामधंदा कोन देत न्हाई. म्हणून चोरी करावं लागते.'' (उपरा, पृष्ठ क्र.50) असे लेखकाचे म्हणणे आहे. म्हणूनच या समाजाला जगण्यासाठी चोरी करणे आवश्यक वाटते. चोरी करण्याचे अनेक प्रकार आणि भरपूर किस्से लेखकांनी या आत्मकथनात सांगितले आहेत. लक्ष्मण गायकवाड ह्यांनी

साहाय्यक प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख, गणपतराव आरवाडे वाणिज्य महाविद्यालय, सांगली

चोरीच्या शिक्षणाविषयी सुरुवातीलाच खुलासा करुन टाकला आहे. आमच्या चोऱ्याचे चार प्रकार आहेत. 1) टिवस्तंग मतणे म्हणजे खिसे कापणे. 2) चप्पूल मुठल आणणे म्हणजे चप्पल (पादत्राणे) गाठोडे चोरणे 3) पू म्हणजे ठकवणे 4. उठेवारी म्हणजे बोलता–बोलता फसवणे. उदाहरणार्थ नकली सोने देऊन असली सोने हडपणे (उपरा पृष्ठ क्र.8,9) ह्या चार प्रकारच्या चोऱ्या शिकविण्यासाठी आईवडील आपल्या मुलांना सक्ती करतात. चोरीचे शिक्षण देणाऱ्या ह्या जमाती चोरी करुन कशा जगतात. चोरी करुन जगण्यामुळे त्यांना काय भोगावे लागते ह्याचे विषण्ण करणारे वर्णन उचल्यामध्ये आलेले आहे. उचल्यांच्या चोरी व्यवहारातील अशा अनेक आठवणी या आत्मकथनात आलेल्या आहेत. ''आठ–नऊ वर्षाच्या मुलाला किंवा मुलीला चोरीचे शिक्षण देण्यात येते. चोरी केल्यानंतर चांगला मुद्देमाल मिळावा म्हणून ते मोहिमेवर निघण्यापूर्वी देवीची करुणा भाकतात. खिसे कापायची ब्लेड किंवा पाते म्हणजे त्यांना देवच वाटत असे. या संदर्भात आमच्या उचल्याच्या घरात देवापरीस मोठा आमचा दाखला वाटायचा अन खिसे कापायची भारत पत्ती घरातली लक्ष्मी वाटायची.'' (उपरा, पृष्ठ क्र.3) लेखकाचे हे विधान नेमक्या वास्तवावर बोट ठेवणारं आहे. या समाजात चोरी करायला जाण्याआगोदर देवाला कोंबडयाचा बळी दिला जातो. या समाजता खिसे कापायचे ब्लेड किंवा पाते याची पुजा केली जाते. हे देवा! यश दे तिरगायला येश येऊ दे. पोलिसापासून वाचव(उपरा पृष्ठ क्र.6) असे ते देवाला साकडे घालतात चोरी मिळावी पोलिसांनी पकडू नये, भरपूर पैसे मिळावेत यासाठी देवाची प्रार्थना करुन त्यांच्या पाया पडतात.

लक्ष्मण गायकवाड यांनी 'उचल्या' या आत्मकथनात त्यांचे कुटुंब, आपली रीतीरिवाज, प्रथा– परंपरा, श्रध्दा– अंधश्रध्दा, त्यांच्या समाजाची मानसिक अवस्था, दारिद्रय, अज्ञान–निरक्षरता, मागासलेपणा इत्यादीचे तपशीलवारपणे चित्रण केलेले आहे. 'उचल्या' हे आत्मकथन म्हणजे केवळ लक्ष्मण गायकवाड यांच्या एकटयाची जीवनकहाणी नसून समाजव्यवस्थेमुळे घोर अंधःकारात जीवने कंठणाऱ्या समाजाचे सर्वांगीण चित्रण आहे. अन्नासाठी या समाजाला बालपणापासून चोऱ्या कराव्या लागतात. हे या समाजाचे फार मोठे दुर्दैव आहे. कपड्यांच्या बाबतीतही या समाजाची स्थिती खूपच भयावह आहे. चोरी करणारी टोळी कशा पध्दतीने चोरी करत असे याचे तपशीलवार वर्णन 'उचल्या' या पुस्तकात कित्येक ठिकाणी पहावयास मिळते. लक्ष्मण गायकवाड ह्यांनी हया चोरीच्या शिक्षणाविषयी लिहिलं आहे. ''चोऱ्या करण्याच्या आदी मार खाण्याचं शिक्षण देतात?'' (उपरा, पृष्ठ क्र.5) हे मार खाण्याचं शिक्षण अगदी रानटी प्रकारचं आहे. एखादा नवशिका चोर चोरी करताना सापडला तर त्यांने पोलिसांनी कितीही मारले तरी इतरांची नावे सांगू नयेत म्हणून त्याला मार खाण्याचे शिक्षण दिले जाते. यासंदर्भात लेखकाने माणिक या भावाची आठवण सांगितली आहे. तरी वाचकांना थक्क करणारी आहे.

'उचल्या' या जमातीचा मुख्यप्रश्न हा पोटाची भूक कशी भागवायची हा आहे. यासाठी ते ''उंदरं, ससं, मुंगस, हरण, घोरपड, व्हले, बदके, बगळे, कासव, मासं, रानमांजर, तितरं, डुक्कर, पाणकुत्रे, मोर'' (उपरा, पृष्ठ क्र.8) इत्यादी प्राणी, पशुपक्षीही मारुन खातात. या समाजामध्ये माणूस मेल्यानंतर दुःख अनावर होऊ नये म्हणून दारु पिण्याचाही उल्लेख येतो. गुन्हेगार जमातीला स्वसमाजाच्या जात पंचायतीचा आणि पोलिसांचा छळ सहन करावा लागतो. अशा अमानुष छळांची प्रकरणे ह्या आत्मकथेत विपुलपणे आलेली आहेत. या समाजात कमालीचे दारिद्रय आहे. उचल्या समाजातील माणसांच्या मनावर अंधश्रध्देचा खूपच प्रभाव असल्याचे दिसून येते. या समाजात शिक्षणाविषयी कमालीची उदासीनता दिसून येते. लक्ष्मण गायकवाड यांना त्यांचे वडील शाळेत घालतात. तेव्हा त्यांच्या समाजातील लोक म्हणतात, तुझ्या लक्ष्याला साळंत घातलस म्हणून आमच्या लेकरावानला हागवक, उलटया सुरु झाल्यात.आपल्या आळीत कधीच पटकी आली नव्हती,आज पत्तुर कसलीय रोगराई नव्हती. बरं मारतंडा तुझं हे कडू पोरगं लक्ष्या साळंत गेल्यापासून हा रोग आपल्यात आलाय बघ मार्तंड–––––– अरं मार्तंड आपल्या लोकाली साळा धार्जीन नाही. आपल्या वाडवडलांपास्नं कुनी शाळा शिकलंय का.आपलं पोर जर साळंत चाललं तर समद्याचा वंस बुडंल. यल्लमादेवी कोपल. बघ मार्तंड तुजं पोर साळंत गेलं तर जातपंचायत बसवू अन तुमच्या घराला वाळीत टाकू.'' (उपरा, पृष्ठ क्र. 20 ) यावरुन ह्या समाजावर अंधश्रध्देचा केवढा मोठा जबरदस्त पगडा बसलेला आहे हेच दिसून येते. जातपंचायतीचे वर्चस्व इतर समाजापेक्षा भटक्या जमातीमध्ये अधिक असल्याचे दिसून येते. आत्मकथनात जातपंचायतीचे संदर्भ जागोजागी पहावयास मिळतात. लक्ष्मण गायकवाड यांनी आपला आत्मकथनात आपले कुटुंब, आपली जात, कुळ, त्याचे आचार–विचार, जीवनव्यवहार, रीतीरिवाज, श्रध्दा, अंधश्रध्दा, समाजाची आर्थिक मानसिक अवस्था, त्यांचे परस्परांतील संबंध दारिद्रय, त्या दारिद्रयाची कारणे, अज्ञान व अशा भयावह परिस्थितीत त्यांचे 'उचल्या' मध्ये लक्ष्मण गायकवाडांच्या आयुष्याबरोबरच त्यांच्या 'उचल्या' या समाजाचे सर्वांगीण चित्रण पहावयास मिळते स्त्रीला विकत घेणे आणि तिला विकणे यांचेही संदर्भ या आत्मकथनात जागोजाग आढळतात ज्या समाजाला जनावरासारखी वागणुक इतर समाज देतो. त्या समाजातील पुरुष त्यांच्या स्त्रियांना आणखी हीन लेखून छळतात. आपल्या वासनातृप्तीसाठी वापरावयाची एक भोग्य वस्तू याशिवाय स्त्रीला येथेही किंमत नसल्याचे दिूसन येते.

'उचल्या' आत्मकथनामध्ये लातूर परिसरातील ग्रामीण बोलीचा वापर मोठ्या प्रमाणात आलेला आहे. या आत्मकथनातील घराम्होरं, मव्हाळ, रकटं, तवर, हारबड, अपरुक इत्यादी या भागातील ग्रामीण शब्दही वाचकांचे लक्ष वेधून घेतात. तसेच खिस्तंग मत्ताय, तिरगाया संताल, येडकुलं मुट्टल इत्यादी तेलगू शब्दांचाही सर्रास वापर आढळतो. लक्ष्मण गायकवाड याचे संपूर्ण आत्मचरित्र हे संघर्षाच्या दिशेने विकसित होत गेलेल्या एका बंडखोर मानसिकतेचं आत्मनिवेदन आहे.

लक्ष्मण गायकवाड ह्यांना त्यांच्या जातीमुळे 19 वेळा खोल्या बदलाव्या लागल्या आहेत. हे जसे खरे आहे, तसे त्यांना अनेक सवर्ण लोकांनीही मदत केल्याचे दिसून येते. थोडक्यात, लक्ष्मण गायकवाड यांनी 'उचल्या' या आत्मकथनाच्या माध्यमातून उचल्या या एक उपेक्षित, दुर्लक्षित व शोषित समाजाच्या दुःखाला वाचा फोडण्याचे काम केले आहे.

**संदर्भग्रंथः**

1. गायकवाड लक्ष्मण, उचल्या, श्रीविद्या प्रकाशन गृह, पुणे – 30, नववी आवृत्ती – 26 जानेवारी 2009.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org